आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२७ जून २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची चीनच्या संरक्षणमंत्र्याबरोबर द्विपक्षीय बैठक, दोन्ही देशांमधे पुन्हा एकदा विश्वास निर्माण करण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर भारताचा कायम भर राहिल्याचं प्रतिपादन

- देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था मजबूत असण्याची गरज राष्ट्रपतींकडून व्यक्त

- २०२६ च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा, राज्यात ऊसाचं क्षेत्र आणि उत्पादन वाढणार

**आणि**

- बांगलादेशातल्या २०१४, २०१८ आणि २०२४ च्या निवडणुकांमधल्या अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी हंगामी सरकारकडून पाच सदस्यीय समिती स्थापन

**<><><><><>**

भारत आणि चीन दरम्यान पुन्हा एकदा विश्वास निर्माण करण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर भारतानं कायम भर दिल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. चीनचे संरक्षणमंत्री ॲडमिरल डोंग जुन यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत ते बोलत होते. चीनमध्ये सुरू असलेल्या संरक्षणमंत्र्यांच्या शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर ही द्वीपक्षीय चर्चा झाली.

सीमावाद, तणाव निवळणं, सीमा व्यवस्थापन आणि सीमारेषांची निश्चिती या मुद्द्यांवर विविध पातळ्यांवर सल्लामसलत सुरू ठेवण्याचं दोन्ही नेत्यांनी सांगितलं.

या बैठकीत राजनाथ सिंह यांनी पहलगामचा हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरची माहिती चीनच्या संरक्षणमंत्र्यांना दिली.

**<><><><><>**

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी मजबूत MSME अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय MSME दिनाच्या कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. MSME क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

- **होल्ड बाईट - राष्ट्रपती -**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. जगभरात MSME क्षेत्राची महत्त्वाची भूमिका ओळखून संयुक्त राष्ट्रांनी २०१७ मध्ये २७ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय MSME दिन म्हणून घोषित केला. यंदाचा MSME दिवसाचा विषय, शाश्वत विकास आणि नवोन्मेषाचे चालक म्हणून MSME ची भूमिका वाढवणं हा आहे.

**<><><><><>**

ओडिशाच्या रेल्वेच्या  पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गेली  अकरा वर्षे ऐतिहासिक ठरली आहेत, असं  प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लिहिलेला एक लेख शेअर करताना मोदी बोलत होते.

चालू आर्थिक वर्षात ओडिशाच्या रेल्वे अर्थसंकल्पातल्या  वाटपात १२ पट वाढ होऊन दहा हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मिळाला आहे, वर्ष २०१४ पासून, ओडिशात दोन हजार किलोमीटरपेक्षा  जास्त अंतराचे  नवीन रेल्वे रूळ बनवण्यात आले आहेत, जे मलेशियाच्या संपूर्ण रेल्वे नेटवर्कपेक्षा जास्त आहे. असं  वैष्णव यांनी  त्यांच्या लेखात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भविष्यातला माणूस घडवण्यासाठी जे आवश्यक आहे, त्यानुसार शैक्षणिक धोरणाचं उद्दिष्ट्य निश्चित करण्याची गरज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नागपुरात मंथनच्या वतीनं आयोजित शिक्षक परिसंवादात बोलत होते. जगात समाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. आपल्याला विश्वगुरू व्हायचं आहे, जगातली तिसरी अर्थव्यवस्था व्हायचं आहे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करायचा आहे, असं प्रधानमंत्र्यांचं स्वप्न आहे. विश्वगुरू म्हणून मान्यता फक्त आर्थिक आधारावर शक्य नाही. त्यासाठी आपली संस्कृती, परंपरा, मूल्याधिष्ठित जीवन पद्धती याचा देखील विचार करावा लागेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी आज इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची यांच्याशी इराणमधल्या परस्थितीबाबत चर्चा केली. इराणच्या परराष्ट्र मंत्र्याशी झालेली चर्चा फलदायी ठरल्याचं परराष्ट्र मंत्र्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. भारतीय नागरिकांना मायदेशी सुरक्षित परत आणण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल जयशंकर यांनी सय्यद अरघची यांचे आभार मानले आहेत.

**<><><><><>**

सन २०२६च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन १५ टक्क्यानं वाढून साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे ही वाढ होण्याची शक्यता एका पतमानांकन संस्थेच्या अहवालात वर्तवली आहे. जास्त पाऊस पडल्यामुळे ऊस उत्पादक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात, उसाचं उत्पादन आणि लागवडीखालचं क्षेत्र वाढणार आहे. पुरवठा वाढल्यामुळे देशांतर्गत पुरवठ्याची चिंता कमी होईल.

धोरणात्मक परिस्थिती अनुकूल राहिली तर इथेनॉल उत्पादनही मोठ्या प्रमाणात होईल, असं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

बांगलादेशातल्या २०१४, २०१८ आणि २०२४ या ३ राष्ट्रीय निवडणुकांमधली अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी मोहम्मद युनुस यांच्या नेतृत्वाखालच्या हंगामी सरकारनं पाच सदस्यीय समिती स्थापन केली आहे. उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालची ही समिती येत्या ३० सप्टेंबरपर्यंत आपला अहवाल सादर करेल. नागरिकांचा मतदानाचा अधिकार, लोकशाहीचं रक्षण आणि हुकूमशाहीला प्रतिबंध हा या चौकशीचा हेतू आहे. पुढच्या निवडणुका मुक्त आणि न्याय्य वातावरणात व्हाव्यात यासाठी हे पाऊल उचललं आहे.

<><><><><>

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींचं विसर्जन प्रथा परंपरेनुसार व्हावं, यासाठी पर्यावरणाच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेलं आणि न्यायालयात टिकेल असं धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिले. सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर समुद्रकिनारे स्वच्छ करण्याची काळजी घेण्यासाठी ठोस उपाय आवश्यक आहेत, असं ते म्हणाले. गणेशमूर्ती तयार करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा आणि नैसर्गिक रंगाचा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार या बैठकीला उपस्थित होते. सार्वजनिक गणेशोत्सव प्रथा परंपरेनुसार साजरा व्हावा. उंच आणि मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी पर्यावरणपूरक मार्ग काढावा, असं ते म्हणाले.

**<><><><>**

हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत महिला गटात ओदिशानं तर पुरुष गटात तामिळनाडू संघानं विजेतेपद पटकावलं आहे. चेन्नई इथं झालेल्या अंतिम सामन्यात ओदिशानं पंजाबवर १-० अशी मात केली. तर पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात तामिळनाडूनं महाराष्ट्राचा ५-० असा पराभव केला.

**<><><><>**

उत्तराखंड उच्च न्यायालयानं त्रिस्तरीय पंचायत निवडणुकांवरची बंदी उठवली आहे. न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकीचं नवीन वेळापत्रक जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. आधीच्या वेळापत्रकात तीन दिवस वाढवण्यात आले आहेत.

**<><><><>**

हरयाणातल्या रोहतक इथं झालेल्या १७ वर्षांखालच्या कनिष्ठ गट राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत सर्व्हिस स्पोर्टस कंट्रोल बोर्डाचे दोन्ही संघ विजेते ठरले आहेत. हरयाणाचा संघ दुसऱ्या तर महाराष्ट्राच्या मुलांचा संघ तिसऱ्या स्थानावर राहिला.

**<><><><>**

२०२९ ला होणाऱ्या पोलीस, आपत्ती व्यवस्थापन सेवा आणि अग्निशामक दलांच्या जागतिक क्रीडा स्पर्धेचं यजमानपद भारताला मिळाल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आनंद व्यक्त केला आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशी ही घटना असल्याची प्रतिक्रिया त्यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. भारतातल्या क्रीडा क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांना जागतिक पातळीवर मान्यता मिळाल्याचं हे द्योतक असल्याचं ते म्हणाले. अहमदाबादमधे ५० हून अधिक क्रीडा प्रकारात ही स्पर्धा होईल.

**<><><><>**

पाकिस्तानमधे खैबर पख्तुनख्वा प्रांतात स्वात नदीला आलेल्या पुरात आज एकाच कुटुंबातले किमान १८ जण वाहून गेले आहेत. मुसळधार पावसामुळे पाण्याची पातळी वाढल्यामुळे हे पर्यटक अडकले. आतापर्यंत सात जणांचे मृतदेह सापडले असून शोधमोहीम सुरू आहे.

//<><><><><>//